शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १२२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# फॉरेक्स ट्रेडिंगच्या नावाखाली १.१३ कोटींची फसवणूक

## आकाश दासरे अटकेत, पाच दिवसांचा पीसीआर; आर्थिक गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी

**जालना । प्रतिनिधी -** फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये मोठ्या प्रमाणात नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची तब्बल १ कोटी १३ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीतील आरोपी आकाश मुंजाजी दासरे यास आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली असून मा. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी (पीसीआर) सुनावली आहे.

याप्रकरणी पोलीस ठाणे तालुका जालना येथे गु.र.नं. ७२०/२०२५ अन्वये इछ्ड-२०२३ मधील कलम ३१८(४), ३१६(२), ३१८, ३३६(३), ३४०(२), ३(५) तसेच MPID अधिनियम १९९९ चे कलम ३, ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**रोबोट ट्रेडिंगच्या नावाखाली कोट्यवधींचा गंडा**

आरोपींनी सह्याद्री ॲग्रो, अमोल इलेक्ट्रॉनिक्स, इझी ट्रेड सोल्युशन, ॲग्रो ट्रेड सोल्युशन या कंपन्यांच्या नावाखाली तसेच रोबोटद्वारे फॉरेक्स ट्रेडिंग केल्याचे भासवून अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक केली. या माध्यमातून एकूण १,१३,००,००० रुपये गोळा करून आर्थिक गंडा घातल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**नफ्याचे खोटे आश्वासन, मालमत्ता विकून पैसे देण्याची हमी**

या प्रकरणातील फिर्यादी सुनिल आसाराम जाधव यांच्यासह इतर गुंतवणूकदारांना मुख्य आरोपी शिवकुमार दत्तात्रय खरात याने फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. एवढेच नव्हे तर, नफा झाला नाही किंवा नुकसान झाले तर माझी स्वतःची मालमत्ता विकून पैसे परत देईन, असे खोटे आश्वासन देत गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले.

**लॉगिन-पासवर्ड न देता बनवला विश्वासाचा खेळ**

गुंतवणूकदारांचे ट्रेडिंग ॲपवर ऑनलाईन खाते उघडून देणे, रक्कम जमा दाखवणे, लॉगिन-पासवर्ड तयार करणे ही सर्व प्रक्रिया आरोपी स्वतः करत होते. मात्र खरे लॉगिन व पासवर्ड गुंतवणूकदारांना दिले जात नव्हते. त्यांच्या मोबाईलमध्ये आरोपींनी इन्स्टॉल केलेल्या ॲपमधून केवळ वाढती रक्कम दाखवून विश्वास निर्माण करण्यात येत होता. ॲप वापरण्याचे प्रशिक्षणही आरोपी देत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

**अत्यंत धोकादायक ट्रेडिंग करून गुंतवणूकदारांची फसवणूक**

फॉरेक्स ट्रेडिंग हा अत्यंत धोकादायक प्रकार असल्याची पूर्ण कल्पना असतानाही आरोपींनी अधिक नफ्याच्या लालसेपोटी आंतरराष्ट्रीय बाजारातील जोखमीच्या कंपन्यांमध्ये ट्रेडिंग केल्याचे दाखवून गुंतवणूकदारांचे मोठे आर्थिक नुकसान केले.

**आकाश दासरे अटक ; नांदेडचा रहिवासी, वाळुज येथे वास्तव**

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी शिवकुमार खरात याचा साथीदार आकाश मुंजाजी दासरे (रा. नांदेड, सध्या रा. वाळुज, छत्रपती संभाजीनगर) यास आज आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. पुढील तपास सुरू असून इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे.

**आर्थिक गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी**

ही कारवाई मा. श्री अजयकुमार बन्सल, पोलीस अधीक्षक जालना, श्री आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, तसेच श्री सिद्धार्थ माने, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (आर्थिक गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही संपूर्ण कामगिरी स.पो.नि. मिथुन घुगे यांच्यासह पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर तसेच महिला पोलीस अंमलदार जया निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# शरदराव बुलगे यांचे निधन



**जालना । प्रतिनिधी -** येथील कांचन नगर भागातील रहिवासी शरदराव बुलगे (सुरंगळीकर) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार (दि २६) रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवार (दि २७) रोजी सकाळी १० वाजता रामतीर्थ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शहरातील पत्रकार महेश बुलगे व मंगेश बुलगे यांचे वडील होत.

# जालना महानगरपालिका निवडणूक एमआयएम पुर्ण ताकदिनीशी लढणार

## जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांचा निर्धार



**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) पक्ष स्वबळावर व पूर्ण ताकदीनिशी निवडणूक लढवणार असल्याची ठाम घोषणा पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांनी केली आहे. पक्षाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून जालन्यात खचखच् मजबूत पर्याय म्हणून जनतेसमोर उभी राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शुक्रवारी जालन्यातील AIMIM पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना शेख माजेद म्हणाले की, राज्यभरात नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये खचखच्ला मोठे यश मिळाले आहे. राज्यातील एकूण १५५ जागांपैकी ८३ जागांवर खचखच्चे उमेदवार विजयी झाले असून एका ठिकाणी नगराध्यक्ष पदही पक्षाने जिंकले आहे. या घवघवीत यशामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून त्याचा थेट लाभ जालना महानगरपालिका निवडणुकीत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**८५ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण**

ते पुढे म्हणाले की, खचखच्चे प्रदेशाध्यक्ष खासदार इम्तियाज जलील यांनी नुकतीच जालन्यातील ८५ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. येत्या एक-दोन दिवसांत जागावाटपाबाबत अंतिम निर्णय जाहीर होणार असून त्यानंतर उमेदवारांची अधिकृत यादी प्रसिद्ध केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

**युतीचा विचार; मात्र प्रतिसाद नसल्याने स्वबळावर निर्णय**

सुरुवातीला काही समविचारी पक्षांशी युतीबाबत चर्चा झाली होती, मात्र संबंधित पक्षांकडून कोणताही ठोस प्रतिसाद न मिळाल्याने एमआयएमने स्वबळावरच निवडणूक लढवण्याचा अंतिम निर्णय घेतला आहे, असे शेख माजेद यांनी स्पष्ट केले.

**उमेदवारी जाहीर**

यावेळी शेख माजेद यांनी सांगितले की, पक्षाने संपूर्ण जालना शहराची जबाबदारी आपल्यावर सोपवली असून स्वतःची उमेदवारीही जाहीर करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आपण शहरातील गरीब, गरजू आणि वंचित घटकांसाठी सातत्याने काम करत आलो असून, त्याच कामाच्या जोरावर जनता आपल्यावर विश्वास दाखवेल, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

**विकास व जनतेच्या प्रश्नांसाठी लढा**

जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवणे, पारदर्शक प्रशासन देणे आणि जालन्याचा सर्वांगीण विकास करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जनता आमच्या पाठीशी उभी राहील आणि एमआयएमचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येतील, असा ठाम विश्वास जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांनी व्यक्त केला.

युवा आदर्श

## विशद ...

सन सनाटी बोलाया
घ्या पत्रकार परिषद
तोचं तोचं तो विषय
पुन्हा पुनश्च विशद
काही खास घडणार
धक्का मिळो सुखद
फोल ठरती अपेक्षा
ऐकवी जुनी खदखद
कसा लुटलो गेलो रे
कहाणी सांगे दुःखद
घरात राहतो गाफील
कुणी केलीयं पारध
विचित्र बातमीदारही
बनाया पाहती नारद
छापतात सनसनाटी
होणारं सगळे गारद
माहीत असून व्याधी
शोधता नवीन औषध
समजून घ्या कुणीतर
रे नेमके कोणते दरद
तोच राग का आळवे
जरी संगीत विशारद
अडकून पडले स्वता
प्रश्न जंजाळात गरद
अर्थ पार बदलू जाय
विसरले ते क्रियापद
विनोदे खेळवी श्रोते
बोल वाटे हास्यास्पद

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# जळतन आणण्यासाठी गेलेल्या आजीसह नातवाचा नदी जवळील खड्ड्यात बुडून मृत्यू

## सदर बाजार पोलीस ठाण्यात ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल...

**जालना । प्रतिनिधी -** आज दि.२६ शुक्रवार रोजी सकाळी ८ वा. मिळालेल्या माहितीनुसार जालन्यात ६५ वर्षाच्या आजीसह ५ वर्षाच्या नातवाचा वली मामू दर्गा परिसरातील कुंडलिका नदीजवळील खड्ड्यांतील पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. काल दिनांक २५ गुरुवार रोजी संध्याकाळी उशिरा ही घटना उघडकीस आली आहे. जनाबाई खरात असं मृतदेह आढळून आलेल्या आजीचं नाव असून राज खरात असं ५ वर्षीय नातवाच नाव आहे. हे दोघेही आजी आणि नातू शहरातील कुंडलिका नदीत जळतन आणण्यासाठी गेलेले असताना ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. कुंडलिका नदीत जळतन आणण्यासाठी गेलेले असताना नदीजवळ पाईप टाकण्यासाठी खोदलेल्या खोल खड्ड्यातील पाण्यात आजीसह तिचा नातू पडले आणि या खड्ड्यातील पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाल्याची प्रथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान या खड्ड्यात मोठ मोठी झाडं आणि शेवाळ असल्यानं दोघांचाही लवकर शोध लागला नाही.



सदर बाजार पोलीसांना घटनेची माहीती मिळताच पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले.अग्निशमन दलाचे प्रमुख माधव पानपट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी अथक परिश्रम घेऊन पाण्यामध्ये गळ टाकून वृध्द महिलेचा मृतदेह पाण्याबाहेर काढला.

या प्रकरणी मृत मुलाचा वडील कृष्णा आनंदराव खरात यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कृष्णा खरात यांच्या फिर्यादीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात कलम २२३, २७२, कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

ड्रेनेजचे काम अपूर्ण ठेवून खड्डा तसाच सोडल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्याने त्याच्यावर कायदेशीर कारवाईची तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधीत ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक सानप हे करत आहेत.

# ४८ तांडा-वस्त्यांना ग्रामपंचायतीचा दर्जा

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या मागणीला यश

**मंठा । प्रतिनिधी -** राज्यातील विकासापासून कोसो दूर असलेल्या तांडा-वस्त्यांना ग्राम पंचायतीचा दर्जा देण्यात यावा, ही मागणी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे विधानसभेत प्रभावीपणे मांडली होती. या मागणीला अखेर यश आले असून, ग्रामविकास विभागाने राज्यातील ४८ तांडा-वस्त्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मंजूर केला आहे.

ग्रामविकास विभागाने राज्यात एकूण १०४ नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यास मंजुरी दिली असून, त्यामध्ये ४८ तांडा-वस्त्यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे मोठ्या ग्रामपंचायतींच्या छायेत राहून विकासापासून वंचित राहिलेल्या तांडा-वस्त्यांचा विकासाचा वनवास संपुष्टात येणार आहे.



राज्यात नवीन ग्राम पंचायती स्थापनेसाठी ग्राम विकास विभागाकडे सुमारे ८०० प्रस्ताव प्राप्त झाले होते. या सर्व प्रस्तावांची तांत्रिक निकषांवर सखोल छाननी करण्यात आली. सर्व अटी व निकषांची पूर्तता करणाऱ्या १०४ प्रस्तावांना अंतिम मंजुरी देण्यात आली असून, त्यामध्ये तांडा-वस्त्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाल्यामुळे या तांडा-वस्त्यांना थेट केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकास योजनांचा निधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, वीज व स्वच्छता यांसारख्या मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास गतीने होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

भौगोलिक अंतरामुळे मुख्य ग्राम पंचायतींपासून दूर असलेल्या अनेक तांडा-वस्त्या व दुर्गम गावांचा विकास रखडला होता. मात्र शासनाच्या या निर्णयामुळे या सर्व वाड्या-वस्त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण झाला आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय प्रत्यक्षात येऊ शकला असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# वीर बाल दिनानिमित्त अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयात वीर बाल दिनानिमित्त गुरु गोविंदसिंहजी यांचे साहिबजादे यांना त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, संपदा कुलकर्णी, कुंदा पठाडे, मिनाक्षी देवर्शी, रविंद्र हेलगट, संतोष वाढेकर, सविता भोकरे, विठ्ठल बोरकर, अतुल केदार, सविता बरडे, ज्योती इंगळे, मिना नगरकर, अनुराधा रणेर, सुनिल काळुंखे यांच्यासह अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय पान

# महापालिका निवडणुका: नवीन पद्धत

निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील एकोणतीस महापालिकांमधील निवडणुका नुकत्याच जाहीर केलेल्या आहेत. तीन वर्षाच्या विलंबाने नवीन निवडणुका जाहीर झाल्यामुळे सगळीकडे मोठ्या प्रमाणात निवडणुकांचे पडघम वाजू लागलेले आहेत.

आतापर्यंत महापालिका निवडणुकीत एका प्रभागातून एकच नगरसेवक निवडून येत असे परंतु महापालिकेच्या आगामी निवडणुकीत *( मुंबई महापालिका वगळता)* यंदा एक महत्त्वाचा बदल लागू करण्यात आला आहे. तो म्हणजे एका वार्डातून चार नगरसेवक निवडून देण्याची पद्धत. या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांमध्ये कुतूहलासोबतच काही प्रमाणात संभ्रमही निर्माण होऊ शकतो. तो दूर करण्यासाठी मतदान करण्यापूर्वी नवीन पद्धतीत काय बदल आहेत हे समजून घेणे आवश्यक ठरते.

नव्या बहुउमेदवारीय प्रभाग रचनेनुसार आता एका वार्डातून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. यामध्ये प्रत्येक मतदाराला चार मते देण्याचा अधिकार असेल आणि सर्वाधिक मते मिळवणारे चार उमेदवार विजयी ठरतील.

नवीन पद्धतीने मतदार जास्तीत जास्त चार किंवा त्यापेक्षा कमी उमेदवारांना मत देऊ शकतो.

नागरिकांनी मतदान करण्यापूर्वी आपल्या विभागात कोणकोणते उमेदवार उभे आहेत तसेच उमेदवाराची पात्रता, कामाची तयारी, प्रामाणिकपणा आणि नागरिकांशी संवाद साधण्याची क्षमता यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरेल.

नागरिकांनी मतदानापूर्वी चारही उमेदवारांची माहिती घ्यावी, प्रचारात दिलेली आश्वासने लक्षात ठेवावीत. लोकशाहीत मतदान हा केवळ हक्क नसून ती एक मोठी जबाबदारी आहे.



आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे की चार नगरसेवक म्हणजे नंतर ह्याच प्रभागाचे चार विभाग होतील का? तर तसे नाही. प्रत्यक्षात कायद्याने असा कोणताही अधिकृत विभाग केलेला नाही. चारही नगरसेवक संपूर्ण प्रभागासाठी समान जबाबदार असतील. नागरिक कोणत्याही नगरसेवकाकडे आपली समस्या किंवा तक्रार मांडू शकतात.

व्यवहारात मात्र नगरसेवक आपापसात कामाचे क्षेत्र अनौपचारिकपणे वाटून घेऊ शकतात परंतु हे वाटप प्रशासकीय नोंदीत कायद्याने ठेवता येणार नाही.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बऱ्याच पक्षांची युती झालेली आहे. नवी पद्धत आणि विविध पक्षांच्या युतीचे गणित यामुळे निवडणूक अधिक गुंतागुंतीची झाल्यासारखी वाटते. सामान्य नागरिकांसाठी हा कसोटीचा काळ ठरू शकतो.

युतीमध्ये चार नगरसेवक निवडावे लागणार तेव्हा युती म्हणजे केवळ विचारांचा मेळ नसून तर ती अंकगणिताची कवायत असते. दोन पक्षांची युती असेल तर दोन अधिक दोन किंवा तीन अधिक एक हा फॉर्म्युला वापरला जाऊ शकतो. हा निकष नागरिकांच्या गरजांवर नाही तर कोण जास्त जिंकू ह्यावर ठरवले जाणार असले तरी नागरिकांनी मात्र निवडणुकीला जाण्यापूर्वी त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे, जेणेकरून योग्य अशा चार उमेदवारांनाच मतदान करता येईल.

या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांना काही फायदे मिळू शकतात. त्यामध्ये एक नगरसेवक दुर्लक्ष करत असल्यास दुसरा पर्याय उपलब्ध राहील. महिलांना आणि विविध सामाजिक घटकांना प्रतिनिधित्वाची संधी वाढू शकते. तसेच चार नगरसेवकांमधील स्पर्धेमुळे कामाचा दर्जा सुधारू शकतो.

एका प्रभागातून चार नगरसेवक ही पद्धत चांगली की वाईट, हे पूर्णपणे नागरिकांच्या जागरूकतेवर अवलंबून आहे. योग्य उमेदवार निवडले आणि त्यांना सतत जबाबदार धरले, तर ही व्यवस्था लोकशाहीसाठी अधिक मजबूत करू शकते. अन्यथा ती गोंधळ वाढवणारी ठरू शकते.

**लेखन : सुधीर थोरवे**
**संपादनः देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

## ऊसाची वाहने आवरा ...

उसाच्या ट्रॅक्टरला धडकून अपघात झाला अशी बातमी हल्ली कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. यावर्षी अशा अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अद्याप वाचायला मिळाली नसली तरी या आधी अशा अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. दोन वर्षापूर्वी दौंडमध्ये झालेल्या अपघातात तीन तरुण मुलांना अशा अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे. काष्टी तालुका श्रीगोंदा येथील पंचविशीतील तीन तरुणांची दुचाकी उसाच्या ट्रॅक्टरला धडकली कारण उसाच्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर बसविण्यात आले नव्हते. रिफ्लेक्टर नसल्याने या तरुणांना उसाचा ट्रॅक्टर दिसला नाही त्यामुळे अपघात झाला आणि त्यात निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. सातत्याने असे अपघात होऊनही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात दोन ते तीन कारखाने आहेत. त्यामुळे ऊस तोड करून उसाची वाहतूक जोमात सुरू आहे मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांच्या पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो परंतु त्या ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात रोखणयासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहन चालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. ऊस वाहतूक करणारे वाहन चालक वाहन रस्त्याच्या मध्येच थांबवतात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते. अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच चालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडले याचा वाहन चालकाला अंदाज देखील येत नाही. मोठ्या आवाजातील गाण्यांमुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहन चालकांना येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याच्या कडेवरील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैल गाडीने देखील ऊस कारखान्यात नेला जाते. उसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही त्यामुळे देखील अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावली तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जिविताशी चालणारा खेळ थांबेल.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे,**
**९९२२५४६२९५**

# अन्यथा पृथ्वीचा विनाश अटळ

अरवली पर्वतांचे खनन खूप जुन्या काळापासून सुरू आहे, परंतु अवैध आणि मोठ्या प्रमाणावर होणारे खनन २००० च्या दशकाच्या सुरुवातीपासून मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने चर्चेत आले, विशेषतः २००२ मध्ये अवैध खननाबद्दल तक्रारी आल्या आणि ऑक्टोबर २००२ मध्ये खनन थांबवण्याचे आदेश सरकारकडून दिले गेले. मुख्यत्वे करून प्राचीन काळापासून अरवली पर्वत ही पृथ्वीवरील सर्वात जुन्या पर्वतरांगांपैकी एक आहे ,असे सांगितले जाते की सुमारे २ अब्ज वर्षे जुनी अरवली पर्वत रांगा आहेत आणि खनिजे काढणे हे नैसर्गिकरित्या घडत असले तरी,आधुनिक काळातील बेकायदेशीर खनन मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. २०२४-२०२५ सर्वोच्च न्यायालयाने नवीन खनन परवाने थांबवले आणि मार्च २०२४ मध्ये सीईसी ने वैज्ञानिक मॅपिंग आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन करण्याची शिफारस केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने १०० मीटरच्या व्याख्येवर पुनर्विचार केला, ज्यामुळे 'अरवली बचाव' मोहीम तीव्र झाली.अरवली पर्वतांचे खनन हे अनेक दशकांपासून सुरू आहे, परंतु अलीकडच्या काळात, विशेषतः २००२ नंतर, ते कायदेशीर आणि पर्यावरणीय वादामुळे खूप चर्चेत आले. दिल्लीपासून हरियाणा आणि राजस्थानमधून गुजरातपर्यंत सुमारे सातशे किलोमीटर पर्यंत पसरलेल्या अरवली पर्वतरांगा भारताचा नैसर्गिक किल्ला म्हणून ओळखल्या जातो म्हणजेच अरवली पर्वत भारताची अबाध्य ढाल आहे. अशा ऐतिहासिक, नैसर्गिक, सुरक्षित,प्राचीन, सांस्कृतिक भारताचा आत्मा अशा महाकाय अरवली पर्वताचे जर आपण अवैधरित्या खनन करीत असाल तर तीला हत्याच म्हणावी लागेल व येणारा काळ अक्राळविक्राळ रूप धारण करून सर्वत्र ओसाड दिसून येईल व पृथ्वीचा आणि निसर्गाचा विनाश झाल्याशिवाय रहाणार नाही.या पृथ्वीतलावर सर्वांनाच रहाण्याचा व जगण्याचा अधिकार आहे.परंतु बुध्दीजीवी मानवाने अतीरेक केला तर मानवाचा अंत तर होईलच सोबतच संपूर्ण मुक्या प्राण्यांचा पशुपक्षी,जीवजंतू, निसर्ग,स्थल,जल,वायु या सर्वांचा श्वास कोंडेल व एक वेळ अशी येईल की सर्वांनाच मृत्यू आपल्याकडे ओढेल आणि या पृथ्वीतलावर संपूर्ण जीवन लीला समाप्त होईल. त्यामुळे आज काळाची गरज आहे की वृक्ष, नदी, तलाव,पर्वतरांगा, डोंगरदऱ्याचा भाग यांना वाचविलेच पाहिजे. कारण खनन व वृक्षतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झालेला आहे आणि हा बदल एवढा झाला आहे की आपण त्याची कल्पना सुध्दा करू शकत नाही यामुळे सर्वत्रच प्रदुषणाचे सावट मोठ्या प्रमाणात दिसून येते. देशातील काही राज्यातील शहर प्रदुषणाच्या बाबतीत रेड झोनमध्ये आले आहेत आणि जगात प्रदुषणाच्या बाबतीत भारत अव्वल स्थानावर आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. दिल्ली सारख्या राजधानीमध्ये प्रदुषणामुळे संपूर्ण दिल्लीमध्ये गॅसचेंबर सारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते.हा संपूर्ण प्रकार औद्योगिकरण, शहरीकरण,जलप्रदूषण,खनन व निसर्गावर होत असलेल्या अत्याचारामुळे व अन्यायामुळे निर्माण झाला आहे.१९९० च्या दशकांपासून अरवली पर्वताच्या खननवर पर्यावरणीय निर्बंध लादले गेले आणि २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने फरिदाबाद,गुरूग्राम आणि मेवात जिल्ह्यामध्ये खाणकामावर बंदी घालण्यात आली होती. तरीही बेकायदेशीर खाणकाम अजूनही सुरू असल्याचे दिसून आले.यावरून स्पष्ट होते की गेल्या अनेक दशकांपासून अरवली पर्वताचे खाणकाम सुरूच आहे.यावरून स्पष्ट होते की खनन माफिया अरवलीच्या भोवताल सक्रिय आहेत.परंतु अरवली पर्वताच्या होत असलेले तिव्र आंदोलन व विरोध पहाता केंद्र सरकारने आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संरक्षित क्षेत्राचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे.२००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हरियाणातील काही जिल्ह्यांमध्ये खाणकामावर पूर्णपणे बंदी घातली होती.तरीही खनन माफिया सक्रिय असल्याने अवैधरित्या खनन करून अरवली पर्वतांना छिन्नविछिन्न करने सुरूच आहे.परंतु आता सरकारने अरवली पर्वताला वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे याचे स्वागत.नोव्हेंबर २०२५ मध्ये पर्यावरण मंत्रालयाच्या नेतृत्वाखालील समितीच्या शिफारशीनुसार सर्वोच्च न्यायालयाने अरवली टेकड्या आणि अरवली पर्वतरांगा यांच्या एकसमान कायदेशीर व्याख्येचा स्वीकार केला.या व्याख्येनुसार अरवली टेकडीम्हणजे स्थानिक आसपासच्या भुभागापेक्षा किमान १०० मीटर उंचीची भूरचना आणि अरवली पर्वतरांगा म्हणजे एकमेकांपासून ५०० मीटरच्या आत अशा दोन किंवा अधिक टेकड्यांचा समूह असे निश्चित करण्यात आले आहे.मात्र या व्याख्याबदलामुळे अरवली क्षेत्राचा ९० टक्के भाग खान कामासाठी खुला होईल,असा आरोप आंदोलकांनी केला आहे.मात्र हा आरोप सरकारने नाकारला असुन अरवलीच्या संरक्षणास कटिबद्ध असल्याचा दावा सरकारने केला आहे.परंतु सरकारचा दावा कितपत सत्य आहे ही बाब पुढील काही काळात लक्षात येईल.सरकारने निसर्गाचा होत असलेला ह्रास पहाता महत्वपूर्ण अरवली पर्वताचे खनन पुर्णतः थांबविले पाहिजे.कारण आज अरवली पर्वताच्या रांगामुळे अनेक विनाशकारी दुर्घटना रोखण्यास मोठी मदत होते आहे व संपूर्ण जीव सृष्टीला मोकळा आणि आल्हाददायक वातावरण निर्माण करण्याचे काम अरवली पर्वताच्या माथ्यावर होत आहे. आज आपल्याला अती ऊन,अती पाऊस, सुनामी, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, ग्लेशियर वितळने, जलप्रदूषण, वायुप्रदूषण, अवकाळी पाऊस,वणवा लागने यावर जर मात करायची असेल तर अरवली पर्वतासारखे संपूर्ण पर्वत व डोंगरदऱ्या यांना वाचविणे काळाची गरज आहे.देशातील राज्य सरकारे व केंद्र सरकार विकासाच्या नावाखाली निसर्गाची खुलेआम कत्तल करीत आहे ही बाब देशातील १४० कोटी जनता उघड्या डोळ्यांनी पहात आहे आणि याचे उदाहरण सर्वांसमोर आहे.त्यामुळेच आज शहरात व गावात हिंसक प्राण्यांचा शिरकाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि यामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात मानवीय व पाळीव प्राण्यांची हाणी होत आहे. सोबतच पाणी टंचाई,जंगलाला वनवा लागने, जंगलातील पशुपक्षांना खाद्यपुर्ती या जंगल तोडीमुळे न होणे या संपूर्ण गोष्टींना जबाबदार देशातील राज्य व केंद्र सरकार आहे. निसर्गाचा होत असलेला ह्रास पहाता सरकारने खनन परवाने वाटप पुर्णतः बंद केले पाहिजे, औद्योगिकरण,शहरीकरण,वाळू उत्खनन यावर अंकुश लावला पाहिजे व अरवली पर्वत रांगा वाचविण्यासाठी सरकारने युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत कारण अरवली पर्वत रांगा ह्या भारताच्या सुरक्षेची ढाल आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# नात्यात विश्वास फार महत्त्वाचा...

हल्ली पती-पत्नीत वादविवाद होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. प्रत्येक घरातील पती-पत्नीमध्ये धुसफूस व कलह सुरू आहेत. रोज होणारे वादविवाद घटस्फोटाला कारणीभूत ठरत आहेत. पती-पत्नीच्या वादाचे अनेक खटले कोर्टात दाखल झाले आहेत. पती-पत्नीत वादविवाद होण्याला कारणीभूत संशय आणि त्यांचे आई-वडील आहेत. पती आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बेदम मारहाण करतो, तिला शारीरिक व मानसिक त्रास देऊन घराबाहेर काढतो. तर कधी कधी पत्नी आपल्या पतीच्या चारित्र्यावर संशय घेऊन आपल्या पतीला भांडत असते. परंतु पुरुष सत्ताक पद्धतीचा पगडा असल्यामुळे आणि समाजात व गावात महिलांपेक्षा पुरुषांचे वर्चस्व अधिक असल्यामुळे पत्नीचे तिच्या पतीपुढे काहीच चालत नाही. ती बिचारी पत्नी तिला सर्व माहीत असून सुद्धा गप्प बसते. परंतु काही महिला खूप धाडसी असतात, त्या आपल्या पतीला जराही वाकत नाहीत. उलट आपल्या पतीला धमकी देऊन व खडे बोल सुनावून आपल्या माहेरी निघून जातात. परंतु ज्या महिला चारित्र्यवान व इमानदार असतात त्या आपल्या अब्रूला घाबरून पतीसोबत वाद-विवाद करण्याचे टाळतात. त्यांना पतीचे सारे काळे कारनामे माहीत असून सुद्धा केवळ त्यांच्या आई-वडिलांकडे पाहून त्यांना गप्प बसावे लागते. पत्नी कितीही वागायला चांगली व चारित्र्यवान असेल किंवा सरळ व नाकाकडे बघून चालणारी असेल तर त्या पत्नीवर सुद्धा पती संशय घेत असतो. पत्नीकडे जर मोबाईल असेल



आणि पत्नी आपल्या घरच्यांना किंवा आपल्या मैत्रिणींना बोलत असेल, तर पती नाहक संशय घेऊन तिला बेदम मारहाण करतो. तिचा शारीरिक व मानसिक छळ करतो. हकनाक तिच्यावर खोटा आळ घेऊन तिला बदनाम करतो. तुझे कोणासोबत तरी प्रेम आहे, तू सारखी तुझ्या प्रियकराला फोनवर बोलत असतेस, तू माझ्यावर मनापासून प्रेम करत नाहीस, तू माझ्या घरातून आता चालती हो आणि तुझ्या प्रियकरा सोबत जाऊन राहा, असे पती आपल्या पत्नीला संशयास्पद बोलत असतो. खरे तर पती-पत्नीत वादविवाद होण्याला अनेक बाबी कारणीभूत आहेत. सासू-सासर्सोबत सुनबाई चे सूत्र जुळत नसल्यामुळे व त्यांच्यात रोज वादविवाद होत असल्यामुळे सासू आपल्या मुलाला सुनबाई बद्दल बरेच काहीबाही लावून देऊन आणि त्याचे कान भरून तिच्या मुलाला त्याच्या पत्नीसोबत वादविवाद करण्यास भाग पाडते. आणि त्या दोघांत होणारे वादविवाद शांतपणे बघत असते. मुलांच्या आई-वडिलांमुळे आतापर्यंत कित्येक मुलांचे संसार कायमचे उध्वस्त झाले आहेत. मुलांच्या आईला आपला मुलगा पत्नीच्या जास्त आहारी गेलेला पहावत नाही. मुलाची पत्नी कितीही चांगली वागू लागली, आपल्या नाकाकडे बघून सरळ चालू लागली, आपल्या चारित्र्याला डाग लागू नये याची काळजी घेऊ लागली आणि आपल्या शिलाला प्राणपणाने जपू लागली तरी सुद्धा सासू-सासरे व तिचा पती तिच्या चारित्र्यावर नाहक संशय घेऊन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो, नाहक अपमान केला जातो व तिला बेदम मारून तिच्या आई-वडिलांकडे पाठवले जाते. हे चित्र सध्या प्रत्येक गावामध्ये आपल्याला पाहायला मिळते. सूनबाई सासूच्या जराही विरोधात वागत असेल तर सासू आपल्या मुलाला तिच्याबद्दल जास्तच सांगून मुलाचे कान भरते आणि तिला मारण्यासाठी व घरातून बाहेर काढण्यासाठी त्याला मजबूर करते. परंतु मित्रांनो सगळीच मुले आई-वडिलांच्या ऐकण्यात नसतात. काही मुले आई-वडिलांचे न ऐकता पत्नीचा आदर करतात. पत्नीवर जीव ओवाळून टाकतात, आणि तिच्यावर जीवापाड प्रेम करून संसार यशस्वी करतात. आई-वडिलांनी कितीही पत्नीबद्दल काहीबाही सांगून पत्नीच्या विरोधात भडकावून देण्याचा प्रयत्न केला, तरी तिचा मुलगा त्याच्या पत्नीसोबत वादविवाद न करता प्रेमाने व आपुलकीने वागत असतो. कारण त्याचा आपल्या पत्नीवर खूप विश्वास असतो. म्हणतात ना पती-पत्नीचे नाजूक नाते विश्वासावर टिकते, एकमेकांना समजून घ्यावे आणि अहंकाराला जाळून टाकावे. पती-पत्नीच्या नाजूक नात्यात विश्वास फार महत्त्वाचा असतो. कोणते ही नाते विश्वासावर टिकते. ज्या नात्यातील विश्वास कायमचा मालवलेला असतो, त्या नात्यात संशयाचे भूत संचारल्याशिवाय राहत नाही. आणि पती-पत्नीचे नाजूक नाते कायमचे तुटल्याशिवाय राहत नाही...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# निस्वार्थपणे सेवा करणारे डिवाईन पॅराडाईज हायस्कूल कल्याण (पूर्व) येथील सुरक्षा रक्षक; सुभाष कदम

शाळेतील सुरक्षारक्षक म्हणजे अशी प्रशिक्षित व्यक्ती जी विद्यार्थी, कर्मचारी आणि शाळेची मालमत्ता गुन्हेगारी, तोडफोड किंवा इतर धोक्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी नियुक्त केलेली असते, शाळेचा परिसर गस्त घालून, देखरेख करून आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देऊन गस्त घालतात. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने आणि प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे लोकांच्या हालचालींवर लक्ष ठेवतात

शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची नोंद ठेवून आणि योग्य व्यक्तींनाच प्रवेश देणे प्रत्येक पाल्यांबरोबर चांगले संवाद साधनारे शाळेतील सुरक्षा रक्षक हे शाळेच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वाचा आधारस्तंभ असतात. असंच काहीसं डिवाईन पॅराडाईज हायस्कूल कल्याण (पूर्व) मधील व्यक्तिमत्व. श्री. सुभाष कदम मामा (सुरक्षारक्षक) रायगड जिल्ह ! महाड तालुका कोलादपूर या छोट्याशा गावातून न पोट पोट भरण्यासाठी कल्याण पूर्व ज्ञलल नगर येथे राहण्यासाठी असलेले गेली तीन वर्षे काटेकोर पणे निःस्वार्थ सेवा डिवाईन पॅरेडाइज हायस्कूल



येथे बजावत आहेत माझा मुलगा रियाश शिवाजी चौगुले याच्यावर नितांत प्रेम करणारे त्याचबरोबर प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांवर बारकाईने लक्ष ठेवणारे काही कारणास्तव पाल्यांना शाळा सुटल्यास विलंब झाल्यास आपल्याजवळ थांबवून घेऊन ज्या त्या विद्यार्थ्यांना ज्या त्या पाल्यांना पाल्यांच्या स्वाधीन करतात सुरक्षा रक्षक कदम (मामा) यांच्या काम करण्याच्या वृत्तीला सलाम.. त्याच बरोबर त्यांचे सर्व सुरक्षा रक्षक त्याच वृत्तीने काम करतात त्यांच्या कार्याला ही सलाम..!!

**हभप शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो. मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

# न्यूईरा चे दिवस - आठवणी, शिक्षक आणि मैत्रीचा जिवंत इतिहास

अकोल्यात १९४२ साली स्थापन झालेल्या न्यू इरा शाळेच्या १९५३ पासूनच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा, आज, शनिवार, २७ डिसेंबर २०२५ रोजी होत आहे. साधारण एक हजार माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या पैकीच एक, निवृत्त माहिती संचालक श्री देवेंद्र भुजबळ यांनी, शाळेविषयी जागवलेल्या या काही आठवणी.... संपादक

न्यूईरा,म्हणजे न्यूईरा हायस्कूल मध्ये मी पाचवी ते दहावी पर्यंत होतो. नॉर्मल स्कूल मधून मी १९७० साली चौथी पास झालो आणि त्यावेळी एक नंबरची सम जल्या जाणाऱ्या न्यूईरा मध्ये पाचवीत मला दाखल करण्यात आले.

पाचवी पासून मला अ तुकडी मिळाल्याने, मी हुशार नसताना देखील स्वतः ला हुशार समजायला लागलो होतो!

न्यूईरा म्हटले की, मला तिथे काय शिकविले हे आठवण्यापेक्षा, आठवतात ते, शाळेतील काही सर, काही मॅडम आणि माझे काही मित्र. खरं म्हणजे, शिकविलेले आठवले असते तर बरे झाले असते, कारण मी दहावीत नापास झाल्यापासून तरी वाचलो असतो.पण आजच्या भाषेत सांगायचं झालं तर, माझा इमोशनल कोशंट ( खट) कमी पडला. अर्थात मी नापास होणार याची मला इतकी खात्री होती की, परीक्षा झाल्या झाल्या मी आधी माझ्या आजोळी, संगमनेर इथे आणि तिथून पुढे पुणे येथे गेलो आणि पुढील काही महिने तरी मी अकोल्यात फिरकलोच नाही, इतकी तिथे तोंड दाखवायची लाज वाटत होती.

तर पुन्हा न्यूईरा कडे येऊ या. मला आठवतात ते अतिशय तळमळीने पाचवी ते सातवी इंग्रजी शिकविणारे अ म जोशी सर. पांढरा शुभ्र पायजमा आणि पांढरा शुभ्र सदरा घातलेल्या जोशी सरांच्या हातात नेहमी एक वेताची छडी असायची. ते वर्गात आले की, सर्वांना पाय बाहेर काढून बसावे लागायचे. शिकविता शिकविता ते वर्गात, दोन्ही रांगांमधुन दोन्ही कडच्या मुलांच्या वह्या तपासत जायचे. कुणाच्या वहीत काही चूक दिसली की, त्याचा पायावर छडी बसलीच म्हणुन समजा. माझ्या पायावर मात्र त्यांची छडी कधी बसली नाही.

दुसरे एक सर होते, ते म्हणजे गणित शिकविणारे धर्माधिकारी सर. धर्माधिकारी सर गणितासारखेच अतिशय कडक होते. त्यांचा वर्ग नेमका

जेवणाची सुट्टी व्हायच्या आधी असायचा. भूक लागलेली असायची. पोट खपाटीला गेलेले असायचे. अशा वेळी गणित चुकलेले पाहून ते आमच्या पोटाला चिमटा घेऊन तो असा काही पिरगाळायचे की, डोळ्यातून पाणीच यायला लागायचे.ही शिक्षा माझ्या वाट्याला वरच्यावर यायची. अजूनही कधी त्या चिमट्याची आठवण झाली की, डोळ्यात पाणी येते. पुढे या गणिताने आणि त्याच्या जोडीला विद्यान विषयानेच माझा दहावीत घात केला.

आठवी पासून मी सेमी इंग्लिश मीडियम घेतले. तेव्हा देशपांडे मॅडम इंग्लिश शिकवायच्या. गोऱ्यापान, तेजस्वी, शांत आणि नेहमी पांढरी साडीच त्या घालायच्या. त्यांचे अक्षर सुद्धा खूप सुंदर होते. त्या त्यांचे पती, देशपांडे सरांच्या मोटार सायकलवर शाळेत येत जात असायच्या.देशपांडे मॅडम

च्या उलट त्यांचे व्यक्तिमत्त्व. उंच पुरे, धिप्पाड, काळे सावळे, त्यात दाढी राखलेले! ईश्वर आपल्या गाठी स्वर्गात बांधतो, हे त्यांच्या कडे बघून लक्षात यायचे!

आठवीनंतर बायॉलॉजी शिकवायला शैला गोगटे मॅडम, या नवीनच मॅडम आल्या होत्या. फिजिक्स , केमिस्ट्री कोण शिकवायचे ते मात्र काही आठवत नाहीये. मराठी चे शिंत्रे सर मात्र खूपच गमतीशीर होते. आणि ते शिकवायचे सुद्धा गम तीशीरपणे. त्यांनी सांगितलेला एक किस्सा अजून माझ्या लक्षात आहे, तो आहे रस्त्याविषयी. रस्त्याविषयी बोलताना ते म्हणाले होते , रस्ता कसा हवा, की आधी उतार असावा. म्हणजे सायकलला पायडल न मारताच ती वेगाने खाली उतरेल. आणि ती इतक्या वेगाने खाली उतरली पाहिजे की, त्या वेगानेच पुढचा चढ चढली पाहिजे! ( अर्थातच सायकलला पायडल न मारता ) आतापर्यंत मी बावीस तेवीस देशात तरी फिरलो आहे, पण शिंत्रे सरांच्या कल्पनेतील रस्ता अजूनही कुठे पाहायला मिळाला नाही ,यावरून लक्षात येते की, ते काळाच्या किती पुढे होते !

एक उंचेपुरे,धिप्पाड, गोरेपान, थोडेसे लांब ,कुरळे केस असलेले ध्येयवादी गोळे सर होते. विद्यार्थी शाळेत असतानाच त्यांच्यावर चांगले संस्कार होऊ शकतात म्हणुन ते चक्क कॉलेज मधील प्रोफेसरची नोकरी सोडून न्यूईरात सर म्हणुन आले होते.

मित्रांमध्ये म्हणाल, तर अमल दामले, राजेश देवगावकर, अरविंद देशमुख आणि मी असा आमचा चौघांचा छान ग्रुप जम ला होता. माझ्या बेंच वर बसणारा अनिल देवधर याच्याशीही माझी चांगली मैत्री होती. तो लहान असताना, चालू फॅन मध्ये त्याने उजव्या हाताचे बोट टाकले होते. त्यामुळे त्याचे एक बोट ( त्या बोटाला तर्जनी म्हणतात, हे खूप पुढे कळले! ) वाकडे झालेले होते.तर एकदा आम्ही चौघे अरविंद देशमुख च्या उगवा या गावी गेलो होतो. तिथे दोन दिवस त्याच्या वाड्यात, शेतात छान हुंदडत होतो . जेवायला बसलो की, अरविंदची बहीण चौघांनाही गरम गरम पोळ्या वाढत असे, ते ही इतक्या झटपट की, कुणाला पोळीची वाट बघत बसायची वेळच येत नसे.

जाता जाता, सांगू की नको, या संभ्रमात होतो, पण आता सांगूनच टाकतो, ते म्हणजे मी नववीच्या वार्षिक परीक्षेत कॉपी करताना पकडला गेलो होतो. आता काही आपली धडगत नाही, सर्व वर्गासमोर मान खाली घालण्याची वेळ आली म्हणुन प्रचंड अस्वस्थ होऊन गेलो होतो.सर पेपर काढून घेतात, वर्गाबाहेर काढतात,की वाटेल तसे बोलतात अशा काही अपेक्षेत असताना, सरांनी शांतपणे कॉपी काढून घेतली आणि तितक्याच शांतपणे सांगितले, अरे,तुझे भाऊ फर्स्ट क्लास मध्ये आलेले असल्याने, त्यांची नावे शाळेच्या बोर्डावर लागली आहेत आणि तू हे काय करतोस ? इतकेच बोलून बाकी काही न करता निघून गेले.



सरांचे ते शब्द मला इतके विदिर्ण करून गेले की, पुढे आयुष्यात कुठल्याच परीक्षेत काय, इतर कोणत्याही बाबतीत मी, कधी कोणाची कॉपी केली नाही!

**लेखनः देवेंद्र भुजबळ**
**माजी पत्रकार, माजी दूरदर्शन निर्माता,**
**निवृत्त माहिती संचालक,**
**९८६९४८४८००**

# ब्राईट स्टार इंग्रजी शाळेत शिवकालीन शस्त्रविद्या प्रशिक्षण संपन्न

**परतुर । प्रतिनिधी** - परतुर येथील ब्राईट स्टार इंग्रजी शाळेत शिवकालीन यादवकालीन लाठी काठी भाला ढाल तलवार दंडपट्टा सुरूल मांडू इत्यादी युद्ध कलेचे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम शाळेच्या उपमुख्याध्यापिका उज्वला शिंदे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. त्यानंतर क्रांती भूषण मुख्य प्रशिक्षक टेक्निकल डायरेक्टर मराठवाडा विभाग प्रमुख सिलंबम असोसिएशनचे श्री भूषण यादव यांचा सत्कार करण्यात आला .यावेळी राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षक प्रतिक्षा दबबडवार व साक्षी दुग्गड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अविनाश मनवर यांची विशेष उपस्थिती होती. त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी लाठी काठी दंडपट्टा ढाल तलवार इत्यादींचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी विद्यार्थ्यांना सेल्फ डिफेन्से विषय महत्त्व सांगण्यात आले .प्रशिक्षकांनी शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले तसेच शाळेतील शिक्षक शिक्षिका यांना प्रत्यक्ष हातामध्ये दंडपट्टा लाठी काठी यांचे प्रात्यक्षिक त्यांच्याकडून करून घेतले.



याप्रसंगी शाळेच्या संचालिका योगिता मनवर, शाळेचे मुख्याध्यापक गणेश शिंदे ,उप मुख्याध्यापिका उज्वला शिंदे, रोनाल्ड लॉरेन्स, कल्पना मगर ज्योती मोरे ,तेजस्विनी गेहलोत ,ज्योती शिंदे ,ज्योती खरात, दिव्या खरात ,बळीराम पवार ,दादाराव मगर ,रोहित जयस्वाल ,लक्ष्मीबाई काकडे, नंदू ककरिये इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक गणेश शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन रोनाल्ड लॉरेन्स यांनी केले यावेळी बऱ्याच शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रार्थनीय होती.

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१५ डिसेंबर २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसित करुन उद्योगाच्या अनेक संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१५ डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.



# शेतकऱ्यांनी पीककर्ज व किसान क्रेडीट कार्डसाठी 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज करावेत- जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना | प्रतिनिधी -** जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज, किसान क्रेडीट कार्ड तातडीने व सुलभ पध्दतीने उपलब्ध व्हावे आणि शेतकऱ्यांना बँकेत वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज प्रक्रिया जालना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. तरी शेतकऱ्यांनी जनसमर्थ पोर्टलवर नोंदणी करुन पीककर्ज व किसान क्रेडीट कार्डसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी स्वत : अथवा सेतू, महा ई सेवा, सीएससी केंद्राच्या सहाय्याने 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावा. आवश्यक माहिती, कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी झाल्यानंतर अर्ज संबंधित बँकेकडे ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात येईल आणि बँकेकडून नियमानूसार तात्काळ कारवाई करावी. अशा सुचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हा अग्रणी बँक, सर्व राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकांचे शाखा व्यवस्थापक व नोडल अधिकारी यांना पत्राद्वारे दिल्या आहेत. प्रत्येक बँक शाखेने जनसमर्थ अर्जासाठी नोडल अधिकारी नियुक्त करुन अर्ज प्राप्त होताच तात्काळ पडताळणीची प्रक्रिया करावी. पात्र प्रकरणांना प्राधान्य देवून किमान कालावधीत शक्य असल्यास त्याच दिवशी निर्णय देण्याचा प्रत्यन करावा. प्राथमिक पडताळणीनंतरच अर्ज पुढे पाठविण्यात येत असल्याने एकाच कागदपत्रासाठी वारंवार हरकती टाळाव्यात. अर्जात त्रुटी असल्यास नेमकी त्रुटी स्पष्टपणे प्रणालीद्वारे कळवावी. जिल्ह्यातील सेतू, महा ई सेवा, सीएससी केंद्राने शेतकऱ्यांना नोंदणी, अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड, अर्जस्थिती तपासणे आदि बाबींमध्ये मदत करावी. तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांनी




जिल्हा अग्रणी बँकेच्या समन्वयाने तालुकानिहाय मोहिमेचे वेळापत्रक तयार करुन प्रसिध्द करावे. जनसमर्थ पोर्टलची ग्रामपंचायत, कृषी कार्यालय, बँक शाखामार्फत व्यापक जनजागृती करण्यात यावी. अंमलबजावणीत अडचण असल्यास तात्काळ जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक व संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रत्येक आठवड्याला प्राप्त अर्ज, प्रक्रिया अर्ज, मंजूर अर्ज, प्रलंबित प्रकरणे कारणासह प्रगती अहवाल सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा. अशा सुचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत. लाभासाठी शेतकऱ्यांजवळ शेतकरी आयडी, आधार व आधार लिंक मोबाईल क्रमांक, बँक खाते तपशील, पासबुक, किसान क्रेडीट कार्ड व पीककर्ज नियमानूसार जमीन व पीक तपशिल, पॅनकार्ड तसेच बँकेने आवश्यक ठरविलेले इतर दस्तऐवज आदि कागदपत्रे असणे गरजेचे आहे.

# नवनिर्वाचित नगरसेवकांचा मंठ्यात जाहीर सत्कार



**मंठा | प्रतिनिधी -** महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकांमध्ये परतूर येथून वसीम भाई तर सेलू येथून अमजद भाई बागवान यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत नगरसेवक पदावर यश संपादन केले आहे.


या यशाबद्दल मंठा येथील गोल्डन आयुर्वेदिक दवाखान्यात नवनिर्वाचित नगरसेवकांचा गुलाबपुष्प देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सत्कारप्रसंगी दोन्ही नगरसेवकांनी आपल्या-आपल्या प्रभागात विकासकामांना प्राधान्य देत सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमास नगरसेवक उबैद भाईजी बागवान,

डॉ. हाफिज शबाब, मोहम्मद इस्माईल राज, ताहेर बागवान, तौफीक बेलदार, इद्रीस कुरेशी यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

# महानगर पालिका निवडणुकीसाठी महायुतीने रिपाइंसाठी सहा जागा सोडाव्यात- ॲड. चव्हाण



**जालना | प्रतिनिधी -** जालना महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महायुतीच्या मित्र पक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अर्थात रिपाइंला ( आठवले गट) सहा जागा सोडाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे .

याबाबत अधिक माहिती देतांना रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव ड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी सांगितले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले गट) हा महायुतीचा मित्र पक्ष आहे. जालना महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महायुतीच्या नेते मंडळींनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला सहा जागा सोडाव्यात, अशी मागणी नुकत्याच आपल्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत करण्यात आली. या बैठकीस युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ड. सिध्दार्थ चव्हाण, प्रा. डॉ. स्मिता चव्हाण, मधुकर बोबडे, महेंद्र रत्नपारखे, स्वप्नील गायकवाड, अनिल खिल्लारे, विजय खरात, लहू उघडे आदींची उपस्थिती होती.

जालना महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महायुतीच्या नेते मंडळींनी अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्रमांक १,१२,१४,१५,१६ मधून तसेच खुल्या प्रवर्गासाठी प्रभाग क्रमांक ९ मधील १ अशा एकुण ६ जागा सोडाव्यात अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे भाजपचे महाराष्ट्र निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपचे नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, भाजपचे नेते माजी आमदार कैलास गोरंट्याल, शिवाय शिवसेना नेते आमदार अर्जुन खोतकर यांची भेट घेऊन केली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने मागणी केलेल्या प्रभागात पक्षाचे कार्य चांगले असून मतदारांशी संपर्क दांडगा आहे. महायुतीच्या नेते मंडळींनी मित्र पक्ष म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला सहा जागा सोडाव्यात, त्या हमखास निवडून येतील, असा विश्वासही ड. चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

# संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृध्दीयोजनेअंतर्गत ४९ महसूली गावे घोषित करण्याबाबत बैठक संपन्न

**जालना | प्रतिनिधी -** शासन निर्णयानुसार बंजारा /लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणे व सामुहिक विकासाच्या विविध मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संत सेवालाल महाराज बंजारा/ लमाण तांडा समृध्दी योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्यामध्ये महसुल दर्जा प्राप्त व शासन निर्णयातील तरतुदीनुसार लोकसंख्या असलेल्या तांडा वस्ती येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे व महसुल दर्जा देणेस पात्र असलेल्या तांड्याना महसुली गावाचा दर्जा/तांडा देणे या सदंर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय समिती अध्यक्ष आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शासकिय व अशासकिय समिती मधील सदस्यांची दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे बैठक पार पडली.

या बैठकीत जिल्हातील ४९ बंजारा/लमाण तांड्यांना महसूल गाव घोषित करण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. तांडयांना महसूली गावांचा दर्जा देण्यासाठी महसूल मंत्री यांनी वेळोवेळी आढावा बैठका घेतल्या.

तसेच येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हा समितीस मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सदर प्रकरणात वैयक्तीक लक्ष घालून पाठपुरावा केला व त्याप्रमाणे ४९ प्रस्तावास जिल्हा समितीने मंजुरी दिली.




बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा परिषद प्र. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदिप पवार, घनसावंगी तहसिलदार पूजा वंजारी, बदनापूर प्र. तहसिलदार अतुल बने, जाफराबाद गटविकास अधिकारी देविदास मगर, मंठाचे गटविकास अधिकारी एस व्ही गगनशेने, परतुर गटविकास अधिकारी आर. एल. तांगडे, घनसावंगी गटविकास अधिकारी ऐश्वर्या चितारी, अंबड सहाय्यक गटविकास अधिकारी समीर जाधव, विस्तार अधिकारी आर. तट्टू, अशासकीय सदस्य उद्धव पवार ,अर्जुन राठोड, गणेश राठोड यांची उपस्थिती होती.

राज्यातील बंजारा लमाण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या संत सेवालाल महाराज बंजारा/ लमाण तांडा समृद्धी योजना अंतर्गत तांड्यांना स्वतंत्र महसूल गाव घोषित करण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत आज जालना तालुक्यातील १२, बदनापूर तालुक्यातील ०५, अंबड तालुक्यातील ०६ व मंठा तालुक्यातील २६ अशा एकूण ४९ प्रस्तावावर चर्चा करण्यात आली व ते नियमाप्रमाणे मंजूर करुन शासनाकडे सादर केले जाणार आहेत. विविध तालुक्यांतील पात्र तांड्यांचे प्रस्ताव, त्यांची लोकसंख्या, मूलभूत सुविधा, प्रशासकीय निकष तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेण्यात आला. महसूल गाव घोषित करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, अहवाल आणि पूर्तता बाबींची तपासणी करून पुढील कार्यवाहीबाबत निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हास्तरावर एकूण ७८ प्रस्ताव प्राप्त झाले असून, ज्या प्रस्तावांमध्ये त्रुटी किंवा कागदपत्रांची कमतरता आहे, ती तातडीने पूर्ण करुन प्रस्ताव पुन्हा सादर करणेबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहे.

यापुढेही महसूल मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रस्ताव लवकरात लवकर प्राप्त करून घेऊन शासनास सादर करण्यात येतील. असेही सांगितले.

## मंठा येथे संभाजी ब्रिगेडचे शेतकरी न्याय संघर्ष आंदोलन सुरू

# उपकृषी अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचार व अनियमिततेविरोधात ठोस कारवाईची मागणी

**मंठा | प्रतिनिधी -** तालुक्यातील मंडळ क्रमांक १, सज्जा क्रमांक २ अंतर्गत कार्यरत उपकृषी अधिकाऱ्यांच्या गंभीर प्रशासकीय अनियमितता, भ्रष्टाचार व शेतकऱ्यांच्या आर्थिक लुटीविरोधात संभाजी ब्रिगेड, मंठा यांच्या वतीने आज दिनांक २६ डिसेंबर २०२५ (शुक्रवार) रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय (सिड फार्म), मंठा येथे शेतकरी न्याय संघर्ष आंदोलन सुरू करण्यात आले.

या आंदोलनात शेतकऱ्यांच्या फळलागवड, बांबू लागवड तसेच इतर योजनांच्या पाहणी प्रक्रियेत जाणूनबुजून विलंब, अनियमितता व शासकीय नियमभंग करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. तसेच शेतकऱ्यांकडून अवैध आर्थिक मागणी व वसुली करून त्यांची आर्थिक पिळवणूक केल्याचे प्रकार समोर आले असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. शेतकरी भीतीत - अधिकारी लुटीत! अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने प्रशासनाकडे ठोस मागण्या मांडण्यात आल्या असून, संबंधित उपकृषी अधिकाऱ्यावर म



हाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांनुसार तात्काळ निलंबनाची कार्यवाही करावी, आतापर्यंत झालेल्या सर्व औजारे, यंत्रसामग्री व लागवडींची सक्षम अधिकाऱ्यामार्फत दुबार प्रत्यक्ष पडताळणी करावी, शेतकऱ्यांकडून अवैध आर्थिक वसुली करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, फळलागवड व बांबू लागवडीतील विलंब व नियमभंगाबाबत जबाबदार अधिकाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करावी तसेच प्रलंबित अनुदान प्रकरणे व मस्टर तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशा प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शिवश्री बाळासाहेब खवणे यांनी स्पष्ट इशारा दिला की, आज आंदोलनाचा पहिला दिवस असून शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत हे आंदोलन लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपात सुरूच राहणार आहे. प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास आंदोलनाची धार आणखी वाढवण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

या आंदोलनामुळे तालुका कृषी विभागात मोठी खळबळ उडाली असून पुढील घडामोडींकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पैशांचा गैरवापर व बनावट नोटांचा धोका

## साद बिन मुबारक यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**जालना | प्रतिनिधी -**
जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पैशांचा गैरवापर, मतदारांना पैशाचे आमिष दाखवणे तसेच बनावट नोटा चलनात आणण्याचे प्रकार घडण्याची दाट शक्यता असल्याने यावर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून या काळात काही उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात पैशांचा वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अंबड नगरपरिषद निवडणुकीदरम्यान प्रत्येकी चार ते सात हजार रुपये मतासाठी दिल्याची चर्चा होती. अशाच प्रकारे जालना शहरातही गैरप्रकार घडू नयेत यासाठी प्रशासनाने वेळीच पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरात संशयित वाहनांची कडक तपासणी व्हावी, तसेच केवळ शहराबाहेरीलच नव्हे तर शहरातील प्रमुख चौक व मार्गांवरही तपासणी नाके उभारावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. निवडणूक काळात बनावट नोटांचा वापर होण्याचीही शक्यता असून, याआधी जालना शहरात अशा प्रकारचे रॅकेट उघडकीस आलेले आहेत. त्यामुळे अशा संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवून त्यांना निवडणूक काळात स्थानबद्ध करावे, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तसेच शहरातील अनेक लहान पोलीस चौक्या बंद अवस्थेत असल्याने त्या तात्काळ सुरू करून तेथे पोलीस बंदोबस्त तैनात करावा, जेणेकरून नागरिकांना तक्रार नोंदविणे सोपे जाईल, असेही निवेदनात नमूद आहे. झोपडपट्टी भागांमध्ये रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी, गरीब व गरजू नागरिकांना पैशांचे आमिष दाखवून मतदानासाठी वापरणे तसेच बोगस मतदान रोखण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी साद बिन मुबारक यांच्या वतीने करण्यात आली आहे.



या संपूर्ण प्रकरणी जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने स्वतंत्र यंत्रणा उभी करून कडक कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.